सकाळ » TODAY
सिंधुदुर्ग, मंगळवार, ४ ऑक्टोबर २०२२



दोडामार्ग : शरद सावंत यांचे स्वागत करताना डॉ. सुभाष सावंत.

# दोडामार्गमध्ये अभिनय कार्यशाळा

**दोडामार्ग :** "कला माणसाला जगवते. चांगले जगण्याची प्रेरणा देऊन वाईट विचारांपासून दूर ठेवते. माणसाच्या मनामध्ये सर्जनशीलता निर्माण करते. माणूस ओळखण्यास आणि समाजाला समजून घेण्यास प्रेरित करते. त्यामुळे प्रत्येकाने आपल्यातील कलागुण विकसित करणे गरजेचे आहे," असे प्रतिपादन साहित्यिक शरद सावंत यांनी केले. येथील हळबे महाविद्यालयात आयोजित अभिनय कार्यशाळेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सुभाष सावंत होते. शरद सावंत यांनी कॉलेज जीवनापासूनच अभिनय कला जोपासली. ते गेली ३५ वर्षे नाटक जगतात. दूरचित्रवाहिन्यांवरील विविध मालिका, तसेच चित्रपटांमध्ये अभिनय केला आहे. त्यांच्याकडून प्रेरणा घेऊन प्रगती करावी, अशी अपेक्षा प्रा. सुभाष सावंत यांनी व्यक्त केली. प्रा. डॉ. एस. एन. खडपकर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. पी. डी. गाथाडे यांनी प्रास्ताविक केले. सौंदर्या सरवणकरने आभार मानले.